P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad
Address:- Office Of The Commissioner Of Police ,
Premlok Park Chinchwad,
Maharashtra - 411033

# प्रेसनोट दिनांक - २८/११/२०२३

**दि.२७/११/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे**

**भाग १ ते ५ चे गुन्हे**

०१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी ७००/२०२३भादंवि कलम-३०७, ५०४, ५०६ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२६/११/२०२३ रोजी १७.०० वा.चे सुमारास पुष्कर वाईन्स समोर मोकळ्या जागेत पार्किंग मध्ये आकुर्डी पूणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२७/११/२०२३ रोजी २० /०४ वा |
| फिर्यादी | :- | शंकर बाब पांडवे वय २४ वर्षे धंदा - नोकरी रा. पांढरकर वस्ती डोंगरे यांची रूम कर संकलन आफिस शेजारी आकुर्डी पुणे |
| आरोपी | :- | धनश्याम माणिक शिवरकर वय- ४९ वर्षे रा. मु.पो. वाघदराता.खापरी मोरेश्वरजि.नागपुर सध्या रा. पुणेजिल्ह्यामध्ये कुठेही **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी व त्याचे मित्र पुष्कर वाईन्स समोर मोकळ्या जागेत पार्किंग मध्ये आकुर्डी पूणे येथे दारू पित असताना नमुद आरोपी हा त्यांचेकडे रागाने पाहात होता त्यास फिर्यादी याने रागाने का पाहतो असे विचारल्याने नमुद आरोपी याने चिडून जावुन फिर्यादी यांना तेथे पडलेली दारूची रिकामी बाटली हातात घेवुन मादरचोत तुला संपवतोच असे म्हणुन फिर्यादी यांचा जिव जावा या उद्देशाने फिर्यादी यांचे डोक्यावर, मानेवर, छातीवर व चेह-यावर जोरजोरात तिन ते चार वेळा मारून फिर्यादी यांना गंभीर जखमी करून यांना जीवे मारणेचा प्रयत्न केला म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मा. श्री. विकास शेळके सो पोलीस उपनिरीक्षक, ७५२२९०७०७० |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | शिरगाव ३२९/२०२३भा.द.वि.क.१४३,१४४,१४७,१४८,१४९,४२७,४५२,५०४,५०६ क्रिमिनल अमेंटमेंट अँक्ट क.७,आर्म अँक्ट ४(२५),म.हा.पोका क.१३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.२७/११/२०२३ रोजी १७.०० वा.चे. सुमाराम मौजे गहुंजे गावचे हादीत राहते घरी ता.मावळ जि.पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि.२७/११/२०२३ रोजी २२/१०वा |
| फिर्यादी | :- | सागर जालिंदर बोडके वय २६ वर्शे धंदा-कार वॉशिग रा.गहुंजे ता.मावळ जि.पुणे |
| आरोपी | :- | १) विकी शर्मा पुर्ण नाव माहित नाही रा.मामुर्डी ता.मावळ जि.पुणे २) प्रज्वल मळेकर पुर्ण नाव माहित नाही. रा.साईनगर ता.मावळ जि.पुणे ३) करण भिसे पुर्ण नाव माहित नाही. रा.सदर व इतर ४ ते ५ अनोळखी इसम **आरोपी क्रं २ व ३ ताब्यात आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी आरोपी क्रं १ याचे सोबत मामुर्डी येथे मांडव टाहाळयात झालेल्या किरकोळ वादातुन आरोपी मजकुर यांनी फिर्यादीचे राहते घरात घुसुन फिर्यादीचे आई वडीलांना आरोपी क्रं १ याने त्याचे हातातील कोयत्याचा धाक दाखवुन शिवीगाळ करून वडीलांची कॉलर पकडुन तुम्हाला लय माज आला आहे तुमचा मुलगा सागर बोडके याचा खुन करतो त्याला जिवंत सोडणार नाही असे म्हणुन आरोपी क्रं १ याने त्याचे हातातील कोयत्याने फिर्यादीचे घराच्या समोरील खिडकीची काच फोडुन नुकसान करून गल्लीत आरडा ओरडा करून दहशतीचे वातावरण निर्माण केले.म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोना/१८०३जुंदरे मो न.८८८८८५६५७६ |

०३.

पोस्टे व गु रजि.नं. :- महाळुंगे एमआयडीसी ७९३/२०२३भा.द.वि.क. ४४७,३२३,१४१,१४३,१४७,१४९, ५०४,५०६,

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२६/११/२०२३ रोजी ११.०० वा चे सुमारास
मौजे शिंदे गावचे हद्दीत, जमीन प्लॉट नं. पी ए पी एस एच ५४ क्षेत्र ११.३६२ स्क्वेअर मीटरमध्ये मु.शिंदे, पोस्ट वासुली, ता.खेड, जि. पुणे,

गुन्हा दाखल :- दि.२७/११/२०२३ रोजी २२.२०वा

फिर्यादी :- अर्जुन हनुमंत पानमंद, वय ४९ वर्षे, धंदा- शेती, रा. मु. शिंदे, पोस्ट वासुली, ता.खेड, जि. पुणे,

आरोपी :- १) विकास जगन्नाथ पानमंद,
२) आनंद जगन्नाथ पानमंद,
३) उत्तम जगन्नाथ पानमंद,
४) बेबी जगन्नाथ पानमंद
५) जगन्नाथ रामचंद्र पानमंद सर्व रा मु.शिंदे, पोस्ट वासुली, ता.खेड, जि. पुणे.
**आरोपी अटक नाही**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादी व फिर्यादीचा मुलगा श्रीनाथ असे त्यांचे मालकीचे जमीन प्लॉट नं. पीएपीएसएच ५४ क्षेत्र ११.३६२ स्क्वेअर मीटरमध्ये क्षेत्रामध्ये हायवा ट्रक नं.एम.एच.१४/एच.यु.८६८६ ही मध्ये जमीन प्लॉट भरावासाठी लागत असलेला मुरुम भरुन आमचे क्षेत्रामध्ये आणु टाकत होतो, सदरचा ट्रक खाली करुन आमचे क्षेत्रातुन परत जात असताना फिर्यादीचे चुलते आरोपी क्रं ५ यांनी आम्ही आमचे क्षेत्रामध्ये विकसन न करण्याचे कारणावरुन ॲक्टिव्हा मोटार सायकल गाडी नं. एम.एच.१४/एफ.एच.४६८० ही घेवुन आले व ट्रक समोर मोटार सायकल उभी करुन आमचा ट्रक अडवला व ते आमचे ट्रक चालकाला शिवीगाळ करु लागले म्हणुन फिर्यादी व मुलगा श्रीनाथ असे आरोपी क्रं ५ यांना समजावुन सांगत असताना फिर्यादीचे चुलत भाउ व चुलती नमुद आरोपी मजकुर असे त्या ठिकाणी आले.त्यावेळी आरोपी क्रं १ याचे हातात लोखंडी टॉमी होती, आरोपी क्रं २ याचे हातात लाकडी काठी होती आरोपी मजकुर यांनी शिवीगाळ व दामदाटी केली तसेच हायवा गाडीचे ड्रायव्हर पंडीत प्रभत कुसाळकर व सुपरवायझर संदिप नवनाथ मुंढे यांना शिवीगाळ व दमदाटी करुन तुम्ही जर यांचे जमीनीत मुरुम टाकला तर तुमची गाडी पेटवुन देवु व तुम्हाला पण जिवे मारु अशी धमकी दिली तसेच आरोपी क्रं १ याने त्याचे हातातील लोखंडी टॉमीने आम्हाला मारहाण करण्यासाठी फिर्यादी यांचे अंगावर धावुन आला व आरोपी क्रं २ याने फिर्यादी व त्यांचे मुलाला काठीने फटके मारले. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय जाधव ९९२२९४७६२३

०४.

पोस्टे व गु रजि.नं. :- आळंदी ३०९/२०२३ भा.दं.वि कलम ४२०,२८५,२८६ सह जिवनावश्यक वस्तुचा कायदा १९५५ चे कलम ३,७ सह स्फोटक पदार्थ अधिनियम सन १९०८ चे कलम ५ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दिनांक २७/११/२०२३ रोजी १६/०० वा. चे सुमारास
आळंदी, मरकळ रोड, धानोरेफाटा येथील धनेश्वर गॅस एजन्सीचे पाठीमागील बाजूस, पत्र्याचे खोलीत

गुन्हा दाखल :- दि.२७/११/२०२३ रोजी २३/४७ वा

फिर्यादी :- प्रदीप गोरखनाथ गोडांबे पोहवा ८८१, नेमणुक - खंडणी विरोधी पथक, गुन्हेशाखा, पिंपरी चिंचवड

आरोपी :- संदीप नरसिंग लांडगे वय-२४ वर्षे रा. देवनिवास बिल्डिंग, रुम नं.१, ठाकूरवस्ती, मरकळ रोड, आळंदी, पुणे
**आरोपी ताब्यात आहे**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी धनेश्वर गॅस एजन्सीचे पाठीमागील बाजूस, पत्र्याचे खोलीत नमुद आरोपी याने ग्राहकांचे नावे त्यांची परवानगी न घेता गॅस सिलेंडर बुकींग करुन, ज्ञानेश्वर गॅस एजन्सी, भोसले गॅस एजन्सी व खांदवे गॅस एजन्सी येथुन गॅस सिलेंडर आणून, बेकायदेशीरपणे घरगुती वापराचे व अत्यावश्यक सेवेतील गॅस सिलेंडर खरेदी करुन जिवनावश्यक वस्तू असलेल्या घरगुती वापराचा गॅस विनापरवाना मोठया सिलेंडर टाक्यातून काढून छोटया ४ किलो वजनाच्या लोखंडी सिलेंडर टाक्यामध्ये रिफील पिन चे साहाय्याने धोकादायकरित्या, कोणतेही सुरक्षेची काळजी न घेता, लोकांच्या जीवीतास धोका निर्माण होईल हे माहीत असून सुध्दा मानवी जिवीतास हानी पोहचविणा-या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहण्यास पुरेसा इतका बंदोबस्त करणे

गरजेचे असताना अतिशिघ्र ज्वालाग्राही पदार्थ असल्याचे माहीती असूनही त्याबाबत पुरेसा बंदोबस्त करणेस जाणीवपूर्वक टाळून, लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अशी कृती करून गॅस ट्रान्सफर करून त्या गॅसच्या भरलेल्या टाक्या चढे दरात स्वतःचे आर्थिक फायदयाकरता विक्री करून लोकांची व शासनाची फसवणुक करून, विनापरवाना, अवैधरित्या गॅस टाक्या व गॅस ट्रान्सफर करण्यास लागणारे साहीत्य असा एकूण ६२,८००/- रु. किंमतीचा अवैध गॅस साठा व साहीत्य विक्री करण्याचे उद्देशाने जवळ बाळगले असताना मिळून आले आहेत. म्हणून

त.अधिकारी/अंमलदार :- मपोउनि माने मो.नं .८००५१३७०५४

०५.

पोस्टे व गु रजि.नं. :- चाकण १०१९/२०२३ भादवि का क २७९,३३७,३३८,३०४(अ), ४२७ मो .वा.का १८४,१२८ प्रमाणे

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२७/११/२०२३ रोजी १३.३० वा.चे सुमारास मौजे कडाचीवाडी ता.खेड जि.पुणे गांवचे हददीत तिरंगा हॉटेल जवळ शिक्रापुर ते चाकण रोडवर

गुन्हा दाखल :- दि.२७/११/२०२३ रोजी १८/०७ वा

फिर्यादी :- संकेत संतोश सातपुते वय १८ वर्शे व्यवसाय षिक्षण रा.करंदी कॅनॉल जवळ जमीन गट नंबर १०१३ मध्ये ता.षिरूर जि.पुणे

आरोपी :- विधीसंघर्षित बालक **आरोपी मयत झाला आहे**

तपशिल :- नमुद तारखेस वेळी व ठिकाणी फिर्यादीचा मित्र नमुद आरोपी याने त्याचे ताब्यातील होंडा कंपनीची शाईन मोटार सायकल नंबर MH.12/TE 2751 हि स्वतः चालवित त्याचे पाठीमागे फिर्यादीचा चुलत भाऊ वैभव विनायक सातपुते वय १६ वर्शे व फिर्यादीस बसवुन शिक्रापुर बाजुकडून चाकण बाजुकडे ट्रिपल सिट येत असतांना ती भरधाव वेगात चालवुन एका कंटेनरला डाव्या बाजुने ओव्हरटेक करून कच्चे मातीचे रोडवरून चाकण बाजुकडे जाणारी एक सायकल डांबरी रोडवर आली असता मोटार सायकलचा जोरात ब्रेक दाबुन मोटार सायकल स्लीप होवुन रोडवर आपटून घासत जावुन अपघात करून अपघातात फिर्यादीचे उजवे पायाला मुक्का मार लागुन, चुलत भाऊ वैभव याचे उजवे हाताला गंभीर दुखापत होवुन स्वतःचे डोक्याला गंभीर मार लागुन स्वतःचे मृत्यूस कारणीभुत होवुन मोटार सायकलचे नुकसाणीस कारभुत झाला आहे. म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- सहा पो फौज राठोड ९६७३६८३७५५

०६.

पोस्टे व गु रजि.नं. :- चिंचवड ५८४/२०२३ भा.दं.वि कलम१७०,४१९,४२०

गु.घ.ता.वेळ व ठि. :- दि.२७/११/२०२३ रोजी ०९/०० वा. सुमा. एल्प्रो स्कुल समोरील रोडवर, राजपार्क सोसायटी समोर चिंचवडगाव, पुणे. येथे

गुन्हा दाखल :- दि.२७/११/२०२३ रोजी १६.०० वा

फिर्यादी :- ताराचंद मांगीलाल शर्मा वयः-७१ वर्षे धंदाः- सुखवस्तु राः- अ/७, झुलेलाल कॉम्पलेक्स, लिंकरोड, पिंपरी, पुणे.

आरोपी :- एक इसम हेल्मेट घातलेला युनिकॉर्न मोटार सायकल वरील अनोळखी इसम

तपशिल :- नमुद केले तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी वॉकींग करत असताना नमुद आरोपी याने पोलीस असल्याचे सांगुन"काल, येथे अनोळखी व्यक्तीने सकाळी फिरणारे लोकास मारहाण करुन त्याचे पैसे व सोन्याचे दागिने चोरी करुन गेले आहेत." अशी बतावणी करुन फिर्यादीला विश्वास दाखवुन फिर्यादी यांचेकडील ३३,९००/- रु रोख रक्कम व ,५५,०००/- रु किं चे सोन्याचे दागिने असा एकुण ८८,९१०/- रु किं चा मुददेमाल हातरुमाल मध्ये टाकण्यास सांगुन सदरचे दागिने रुमालसह फसवणुक करुन घेवुन गेला आहे म्हणुन

त.अधिकारी/अंमलदार :- पोउपनि रनवरे ९५५२५५०३१४

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ११४७/२०२३ भा.द.वि.क. ४०६, ४१९, ४२०, ३४ सह माहीती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारीत) कायदा २००८ चे कलम ६६ (सी)(डी) |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१५/०४/२०२३ रोजी १६.३० वा. ते दिनांक १६/०४/२०२३ रोजी १५.०० वा. चे दरम्यान फिर्यादी यांचे मोबाईल फोनद्वारे राहते घर नं.११०२,लोरेला सोसायटी, थेरगाव रोड वाकड, पिं.चिं. पुणे येथुन |
| गुन्हा दाखल | :- | दि.२७/११/२०२३ रोजी १८/४१ वाजता |
| फिर्यादी | :- | ध्रुवा राहुल गुप्ता, वय ३१ वर्षे, धंदा नोकरी, रा. घर नं. ११०२, लोरेला सोसायटी, थेरगाव रोड वाकड, पिं.चिं. पुणे. मुळ रा. ग्राम स्वरुप कॉलनी, पोलीस ठाणे व जिल्हा मुदाराबाद, राज्य उत्तरप्रदेश. |
| आरोपी | :- | (६३०)९३४-६९२१ व बनावट टेलिग्राम आयडी Luna463211<br>9010667136@ybl ,kamil6664@idfcbank ,,आय.सी.आय.सी.आय.बँक खाते क्र. १२२१०५५००३३८<br>आय.सी.आय.सी.आय.बँक खाते क्र. ६४१४०५०५२८५९<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांचे मोबाईल नंबरवर, मोबाईल नंबर (६३०) ९३४-६९२१ यावरुन जॉबची ऑफर आल्याने व त्याकरीता सहमती दिल्याने त्यांनी फिर्यादीस सुरुवातील काही टास्क दिल्याने फिर्यादीने ते यशस्वी पुर्ण केल्याने फिर्यादीचे खात्यावर ३१००/- रुपये पाठवुन फिर्यादीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर आरोपींनी फिर्यादी यांना काही कुपन पाठवुन त्यावरील रक्कम फिर्यादीने त्यांचेकडे भरल्यास त्याचे दुप्पट रक्कम फिर्यादीना ते परत करणार असे सांगितल्याने फिर्यादीने त्यांचे खात्यावर एकुण ३,९६,०००/- रुपये पाठविले. परंतु त्यांचेकडुन फिर्यादीस कोणत्याही प्रकारची रक्कम खात्यावर आली नाही. त्यानंतर फिर्यादीने त्यांचेशी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता फिर्यादीचा त्यांचेशी संपर्क झाला नाही. त्यावेळी फिर्यादीचे लक्षात आले आरोपी मजकुर यांनी जॉब ऑफरच्या बहाण्याने जास्त रक्कम देण्याचे आमिष दाखवुन आरोपींनी फिर्यादीची ३,९६,०००/- रु रक्कमेचा अपहार करुन फिर्यादीची ऑनलाईन सायबर फसवणुक केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | एस.एस. जाधव, सहा. पोलीस निरीक्षक, ९६५३३०६१५६ |